# ऋणनिर्देश

प्रस्तूत संशोधन सादर करण्यात मला आनंद होत आहे. हे संशोधन तयार करण्याची संधी मला शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी प्रथमतः शिवाजी विद्यापीठ व शिक्षणशास्त्र विभाग, कोल्हापूर याचे आभार मानतो.

प्रस्तूतच्या संशोधनाकरिता माझ्या मार्गदर्शिका डॉ. प्रतिभा सुभाषचंद्र पाटणकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्यांची सततची प्रेरणा माझ्या संशोधनाला दिशादायी ठरली त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

शिक्षणशास्त्र विभागामधील लाभलेले आदरणीय गुरूवर्य यामध्ये शिक्षणशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. म. सु. पद्मिनी, तसेच अनुभवी तज्ज्ञ अध्यापिका डॉ. नि. र. सप्रे, डॉ. गी. स. पाटील, डॉ. रू. उ. संकपाळ, अनुभवी तज्ज्ञ अध्यापक डॉ. कृ. भा. पाटील व श्री. वि. स. खंडागळे, श्रीमती सु. प्र. पाटील, श्री. आर. के. गवळी यांचेही मला मार्गदर्शन लाभले. त्यासाठी मी त्यांचाही ऋणी राहीन. माझे सहकारी मित्र यांचेकडून वेळोवेळी प्रेरणा मिळाल्यामुळे मी इथपर्यंत पोहचू शकलो त्याबद्दल मी त्यांचाही सदैव ऋणी राहीन.

शिक्षण क्षेत्रात पहिले पाऊल टाकल्यापासून आजपर्यंतच्या प्रवासात कुंटुंबातील आई, वडील, भाऊ व इतर सर्व व्यक्तींची प्रेरणा मिळाल्यामुळ मी इथपर्यंत पोहचू शकलो त्याबद्दल मी त्यांचाही सदैव ऋणी राहीन.

या संशोधनाला गती मिळवून देण्यासाठी शिक्षणशास्त्र विभागातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचेही सहकार्य लाभले त्यामुळे मी त्यांचाही आभारी आहे. तसेच मी निवडलेल्या कोल्हापूर शहरातील अध्यापक विद्यालयाचे (डी.टी.एड.) प्राचार्य व अध्यापक वृंद तसेच तेथील छात्राध्यापक यांनी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. श्री. शिवाजीराव देशमुख अध्यापक विद्यालय, शिराळा येथील प्राचार्य, अध्यापक वृंद व छात्राध्यापकांचा मी आभारी आहे.

तसेच हे संशोधन पूर्ण करीत असताना बऱ्याच पुस्तकांचा संदर्भ घ्यावा लागला त्यासाठी डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी पुस्तके उपलब्ध करून दिली तसेच विभागामध्ये असणाऱ्या ग्रंथालयाचा मला संशोधन कार्यामध्ये उपयोग झाला. श्री. शिवाजीराव देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालयाचा उपयोग झ ाला. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच हा शोधनिबंध आकर्षकरित्या व वेळेत संगणकीकृत टंकलेखन पूर्ण करून दिल्याबद्दल मी श्री. विनायक शिंदे यांचाही मन:पूर्वक आभारी आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : १०/०५/२०१२

**संशोधक**

श्री. महेश अनंतराव शिंदे